 Volume-7 | Issue-11 | November-2018 | PRINT ISSN No 2250-1991

ORIGINAL RESEARCH PAPER

Social Work

# विनोबा भावे यांचे सामाजिक कार्य

KEY WORDS:

Pravina vinod kakade

आचार्य विनोबा भावेजींच्या जीवनात विद्वता अध्यात्मिक दृष्टिकोन आणि दलित व पीडित यांच्याविषयीची अनुकंपा हयांचा मनोहर संगम झालेला दिसुन येतो विनोबाजींनी जीवन भर राष्ट्रांची आणि मानव जातींची विविध प्रकारे सेवा केली. संबंध समाजाचा संपुर्ण कायापालट करण्याचे ध्येय उराशी बाळगुन विनोबांनी आपल्या नम्र प्रयत्नांना सुरुवात केली. विनोबांचा पिंड तपस्येचा, कृती संन्यासाची आणि मार्ग गांधीचा, त्यातून एक नवा आधुनिक युनानुकूल तपस्या प्रकार आकारास आला वर्धाला त्यांनी गांधीजींच्या सर्व विधायक कार्यक्रमांना घेऊन तप सुरु केले.

## 1) राष्ट्रीय शाळा :-

वर्ध्याला विनोबाजींचा आश्रम होता. आश्रमाबरोबरच राष्ट्रीय शाळा निघणे अपरिहार्य होते. राष्ट्रीय शाळा आणि आश्रम यांत फरक इतकाच की राष्ट्रीय शाळेत सेवेची लायकी निर्माण करण्याकडे मुख्य लक्ष दिले जायचे मग तेथुन निघणारा विद्यार्थी कोणी सेवेला सर्वस्वी वाटुन घेतो की, अल्पस्वल्प सेवा करो तो त्याचा प्रश्न राहील. पण सेवेला लागणारी दृष्टि आणि योग्यता त्याला राष्ट्रीय शाळेत मिळालेली असेल. परंतु आश्रमात सर्वस्वी सेवेला वाहिलेलीच माणसे असायची आश्रमात जी काही योग्यता आहे ती सेवेत अर्पण करण्याकडे मुख्य कल असायचा राष्ट्रीय शाळेत योग्यता उत्पन्न करण्याकडे मुख्य कल असे. गांधीजीनीही साबरमतीला आश्रमाशेजारी राष्ट्रीय शाळा काढली होती. चांगल्या गुरुंच्या सानिध्यात राष्ट्रीय शाळेतील मुल असावी तसेच आश्रमा सारख्या आदर्श संस्थेच्या सानिध्यांत राष्ट्रीय शाळा असावी. या सर्व गोष्टींची कल्पना विनोबाजींच्या सहवासामुळे गांधीजीच्या सहवासामुळे जमनालालजींनी होती. विनोबाजींचा सल्ला घेऊन जमनालालजींनी राष्ट्रीय शाळेची स्थापना केली.

विनोबाजींचा 'कौटुंबिक शाळा' हा सिध्दांत होता. या विषयीचा विचार त्यांनी 'महाराष्ट्र धर्म' या मासिकात लिहिला होता. विनोबाजीच्या रोजच्या जीवन शैलीने विद्यार्थी प्रभावित होत असत. विद्यार्थी विनोबास 'आचार्य' म्हणत खरा आदर्श गुरु विनोबाजींच्या रुपात आश्रमात प्रत्यक्ष वावरतांना दिसे. या राष्ट्रीय शाळेत जमनालालजींची मुले आणि त्यांच्या बहिनीची मुले तसेच महाराष्ट्रातील सर्व थोर कुळातली मुले शिक्षणासाठी होती. कुठलाही भेदभाव या शाळेत नव्हता. मुले पायखाने साफ करणे, पाणी भरणे, स्वयंपाक करणे इत्यादी सर्व कामे करीत. परिक्षेवर मुळीच भर नसे विद्यार्थी उद्योगी, सेवक, ज्ञान पिपासु आणि चारित्र्यवान बनावा अशी येथे अपेक्षा असे.

त्याचप्रमाणे इथले विद्यार्थी काही ना काही राष्ट्रकार्याला हातभार लावणारे निघाले कित्येकांनी चर्चा संघात कामे केली. कित्येकांनी आश्रमात दाखल होऊन ग्रामसेवेची कामे केली, कित्येक सत्याग्रहात जेलमध्ये गेले. याचप्रमाणे अनेकांनी अनेक सामाजिक चळवळीत भाग घेतला होता.

## 2) कन्याशाळा :-

राष्ट्रीय शाळा सुरु होऊन २/३ वर्ष झाली होती. अशा स्थितीत ही कल्पना सुचने अगदी स्वाभाविक होती जनमनालालजींनी या बाबतीत विनोबाजीशी सल्लामसलत केली. कार्यकर्त्यांच्या मुलांची आपल्या पध्दतीप्रमाणे शिक्षण देण्याची सोय आपण केली पण कार्यकर्त्यांच्या मुलींची वाट काय? हा प्रश्न आपल्या शक्तीप्रमाणे आपण लहान मुलीचीच काय मोठया स्त्रियांचीही काही सेवा करावयाची म्हणजे त्यांच्यासाठी केवळ अनाथालये काढून भागायचे नाही तर त्यांना सेवेची खरी दृष्टि लाभून त्यांच्या ठिकाणचा दुबळेपणा जाऊन श्रेष्ठ पुरुषार्थाची वृत्ती त्यांच्यात निर्माण होईल आणि त्याही सेवेची परंपरा पुढे चालवतील अशा विनोबाजींच्या कल्पना होत्या.

१५ जुन १९२८ ला कन्याशाळा सुरु झाली या शाळेच्या कामासाठी अण्णासाहेब दास्तानेंच्या सौभाग्यवती श्रीमती वारुबाई या कामासाठी तयार झाल्या. राष्ट्रीय शाळा ज्या शेजारच्या लहान-लहान शिक्षकगृहांत चालत असे त्यातील एक भाग या कन्याशाळेला देण्यात आला. शाळेत मुली निवडक होत्या. त्यांचे शिक्षण राष्ट्रीय शाळेतील मुलांप्रमाणेच असे आश्रमात संध्याकाळच्या प्रार्थनेत मुली हजर असत. विनोबाजी कन्याशाळेतील मुलींकडून गीताई म्हणून घेत आश्रमात तकली उपासनेला मुली सतत काहींना काही शिकत मुलांच्या मानाने मुलींची जबाबदारी विशेष होती या शाळेचे वैशिष्टये ब्रम्हचार्याच्या आदर्शात होते आजपर्यंत मुलांसमोर ब्रम्हचार्यांचा आदर्श ठेवला गेला होता पण मुलींसमोर हा आदर्श कधी ठेवला गेला नाही. कन्याश्रमाद्वारे हा आदर्श मुलींसमोर प्रथमच ठेवला गेला.

पुढे महात्माजींनी साबरमती आश्रमाचा त्याग केल्यानंतर तेथील सर्व मुली येथे आल्या आणि कन्याशाळेचे रुपांतर 'कन्याश्रमात' झाले. हिंदी, गुजराथी आणि महाराष्ट्रीयन अशा तीनही प्रांतातल्या मुली येथे होत्या. अशाप्रकारे कन्याशाळेला भारतीय स्वरुप प्राप्त झाले. हा जरी कन्याश्रम होता तरी येथे विधवा आणि पौढ वयाच्या भगिनीहि शिकत असत. आचार्य विनोबाजी कन्याश्रमात दोन्ही वेळच्या प्रार्थनेच्यावेळी हजर असत तकली उपासनेच्या वेळीही आचार्य हजर असत दर रविवारी सकाळी ८.०० वाजता आचार्यांचे कन्याश्रमाच्या गच्चीवर प्रवचन ठेवलेले असे. त्यातून मुलींना आणि शिक्षकांना जीवनपाध्येय आणि शिक्षणदृष्टी प्राप्त होई.

## 3) वृक्षच्छेद :-

वर्धा जिल्हयात सर्वत्र शिंदीची झाडे होती. या झाडांपासून दारु बनविल्याजाई त्यामुळे लोक व्यसनी बनत चालत होते. या झाडांमुळे वर्धा नागपुर भागात मालगुजारांना चांगले उत्पन्न मिळे आश्रमप्रचारक गोपाळराव वाळुंजकर प्रचारकार्यासाठी खेडयापाडयात फिरत असतांना त्यांना शिंदीची दारु पिणारे लोक दिसले. ही झाडे तोंडून टाकावी असा विचार त्यांच्या मनात आला. त्यांनी याविषयी विनोबाजींशी विचारविनियम केला. विनोबांनी एक बैठक घेऊन काही सुचना दिल्या. शिंदी झाडे तोडून टाकण्याची संबंधी 'यंग इंडिया'त लेख आलेलेच होते. आचार्यांच्या सुचनेप्रमाणे वृक्षच्छेदाच्या कार्याची मोहीम अतिशय वेगात सुरु झाली वृक्षच्छेदनांचे कार्य हा सत्याग्रह नव्हता. यात कोणत्या ही तऱ्हेचा कायदेभंग नव्हता मालगुजारांच्या हद्दीतील झाडे तोडून त्यांना या व्यसनाच्या उत्पन्नाच्या मोहातून सोडविण्याची ही चळवळ होती ही झाडे तोडून जमीन साफ झाली की ती जमीन लागवडीखाली आणावी अशी योजना होती.

शिंदीची झाडे जोडण्याची मोहीम फोफावून गेली. या चळवळीने खेडयातील लोकांच्या जीवनाचा व त्यांच्या मनोवृत्तीचा पुष्कळ परिचय झाला. सामुदायिक रित्या आत्मशुध्दीचा हा लोकांना मोठाच पाठ मिळाला" आत्मशुध्दीची चळवळ हीच खरी चळवळ असे आचार्यांचे मत होते" त्यामुळे आचार्य मधुन मधुन ठिक ठिकाणी या चळवळीत जातीने हजर राहिले स्थानिक ग्रामस्थानींही या कार्याला चांगली साथ दिली आचार्य वाळुंजकर, आश्रमप्रचारक आणि ग्रामस्थ असा हा यावेळी उत्तम संच जमला होता कधीच अशाप्रकारची चळवळ न पाहील्यामुळे या चळवळीला लोकांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला जवळ जवळ तीन महिन्याच्या अवधीत १४ ते १५ हजार झाडे तोडली गेली.

## 4) मंदिर आणि पाणवटयांची मुक्तता :-

मंदिर हे ईश्वरवासनेची जागा आहे आणि तिथे भेदभाव करणे म्हणजे ईश्वराचा अपमान होय. असे विनोबाजींचे मत होते. तीच गोष्ट पाणवटयांची पाणी हे सर्व प्राणी मात्राला कोणाला कोठेही घेता आले पाहीजे. असे विनोबाजींना वाटे मंदिर आणि पाणवटे हे समाज ऱ्हदयाचे एकीकरणाचे दोन दरवाजे आहेत. असे मत विनोबांनी 'गीताई' तुन मांडले 'गीताई' मराठीत लिहुन त्याद्वारे समतेचा महत्वपुर्ण संदेशच त्यांनी समाजाला दिला या दृष्टीची चळवळ आचार्यांच्या प्रचारकांनी वर्धा तालुक्यात अतिशय वेगाने सुरु केली. जमनालालजींनी आचार्यांच्या प्रेरणेने आपले नक्ष्मीनारायणाचे प्रसिध्द आणि प्रशस्त् मंदिर १९२८ साली उघडून सर्व हिंदुस्थानात अस्पृश्यांसाठी मंदिरे मोकळी करण्याचे प्रथम उदाहरण घालुन दिले. हे मंदिर मोकळे केले त्या दिवशी म्हणजे २०/७/१९२८ रोजी सायंकाळी आचार्याचे एताद्विषयक अत्यंत कळकळीचे आणि मर्मस्पर्शी भाषण झाले होते. आचार्यांच्या प्रेरणेने वर्धा शहराच्या आजुबाजुच्या देवळी, नागझरी, रोहिणी इत्यादी गावातील गावकऱ्यांनी गावातील देवळे आणि विहीरी सर्व जातींच्या लोकांसाठी खुल्या केल्या.

1933 च्या हरि जनांसाठी केलेल्या प्रसिध्द उपवासापुर्वी या तालुक्यात 43 देवळे व 300 विहीरी उघडल्या गेल्या ही गोष्ट संबंध हिंदुस्थानात कोठे ही न घडलेली अशी जवळ – जवळ असामान्य होती आचार्याच्या या गावी फार श्रम करावे लागले अवघ्या दोन वर्षात आचार्यांनी वर्धा तालुक्यातील 300 गावात विलक्षण सेवा घडवून आणली.

**5) ग्रामोपासना :-**

1932 सालापासून दोन-तीन वर्ष ग्रामसेवेच्या निमित्ताने आचार्य आणि आश्रमावासि मंडळीचे गावोगावी फिरणे झाले आजुबाजुच्या खेडयांची सेवा करायची असेल तर समग्र सेवेच्या दृष्टीने काही पक्की योजना बनवली पाहीजे. अशा चिंतनातुन 'ग्रामसेवा मंडळाची' स्थापना झाली ग्रामसेवेची ही योजना संपुर्ण वर्धा तालुक्यासाठी बनविण्यात आली होती काही खेडे निवडून तेथे आपल्या कल्पनेनुसार खादी, हरिजनसेवा इत्यादी लोकसेवेची कामे सुरु केली. वर्धा हे हिंदुस्थानच्या स्फुतीचे केंद्र झालेले होते. चोहोकडून येथे येणाऱ्या जिज्ञासु लोकांना येथे ग्रामसेवेच्या कार्याचा नमुना पहावयास मिळण्याची अपेक्षा असणे स्वाभाविक होते. जुन्या खेडयांची सुधारणा करुन जवळ जवळ आदर्श वसाहत निर्माण करणे हे दुसरे काम, शिवाय सबंध हिंदुस्थानातुन ग्रामसेवेच्या साधनांची जी मागणी सुरु होती ती पुरविण्याचे तिसरे कार्य करावे यादृष्टीने आश्रमातर्फे आचार्यांच्या स्फुर्तीने जे प्रचारमंडळ निर्माण झाले होते. त्यातुनच व्यवस्थित 'ग्रामसेवामंडळ' या संस्थेची 6 मे 1934 रोजी स्थापना करण्यात आली. सुरगावसारख्या ठिकाणी सर्वत्र खादीमयता निर्माण व्हावी म्हणून तेथे प्रयोग सुरु झाले. निरनिराळया प्रकारचे चरखे निर्माण करण्यात आले. आचार्यांच्या मार्गदर्शन व सहवासामुळे ग्रामसेवामंडळाचे कार्य स्फुर्तिने सुरु झाले.

**6) गो-उपासना :-**

आचार्यांनी सर्व रचनात्मक कामे उचलुन धरली आणि आपल्या शक्तीप्रमाणे ते करीत राहीले. पण कोणत्याही कामात सुध्दा चित्ताची एवढी आवश्यकता जाणवली नाही, जेवढी गोसेवेच्या कामात जाणवली नाही, आश्रमाकरीता दुधाची आवश्यकता मानली गेली आणि त्या निमित्ताने गोरक्षण सुरु झाले. तेव्हा पासून आजपर्यंत हा स्थुल कार्यक्रम चालू आहे आणि विकसित होत आहे. जळगावच्या राष्ट्रीय शाळेतून योगायोगाने 1921 सालानंतर आश्रमात आलेले आचार्यांचे जुने विद्यार्थी रामदासभाई ग्रामसेवेच्या प्रचारार्थ वर्धा जिल्हयातील मानोली यागावी राहत लोकांची सेवा करीत तेथे त्यांनी गाई ठेवून अल्प प्रमाणावर गोसेवेचा प्रयोग आरंभला

आचार्यांनी सुरगावाला तेलघाणी सुरु केल्या होत्या. या तेलघाणीतून जेवढी पेंड निघेल तेवढया प्रमाणात गाई तेथे ठेवण्याचा विचार केला गेला अशा तऱ्हेने गोसेवेला तेलघाणीसोबत जोडण्यात आले आपण खादी, घाणी आणि गाय या सर्वांचे एकत्र चिंतन केले तरच आपली योजना अयशस्वी आणि अर्थहीन न राहता अर्थयुक्त आणि यशस्वी होईल, असे आचार्यांना वाटे.

**7) महारोगी सेवा मंडळ :-**

आश्रम प्रचारक श्री मनोहर बळवंत दिवाण यांच्या मनात महारोग्यांची सेवा करण्याची कल्पना आली त्यांनी विनोबांशी विचार विनियम करुन या कार्याला वाहुन घेतले आणि आचार्यांच्या छत्रछायेखाली आतापर्यंत हिंदुस्थानात न घडलेली घटना घडून आली ती घटना म्हणजे 'महारोग सेवामंडळाची संस्थापना' ज्या रोग्याचे नसते नाव घेतले तरी अंगावर शहारे येतात अशी सर्वांची मनस्थिती येथे त्या रोग्यांची सेवेला सर्व जीवन वाटुन घेण्याची कल्पना मनात उदभवणे त्यासाठी कार्याला लागणे म्हणजे आश्चर्य अशा सेवेची परंपरा जर हिंदुस्थानात हिनदीन दुबळया महारोग्यांची ममतेने सेवा करण्याची परंपरा दुदैवाने मुळीच नाही. आचार्यांच्या केवळ धर्म दृष्टीने सेवा करण्याच्या जीवनवृत्तीला ही घटना सहजच अतिशय पोषक झाली मे 1936 पासून महारोगी सेवामंडळ वर्धा ही संस्था स्थापण्यात आली. पुढे 'येळीकेळी' येथे उपचार केंद्र स्थापन करण्यात आले दर आठवडयाला रोगी येथे उपचारासाठी येत. आचार्य येता जाता अनेक वेळा या संस्थेत जात मनोहरजींनी गावोगावी फिरुन या संस्थेसाठी पैसे गोळा केले. मनोहरजी ही अनेक वेळा परंधामला येत व महारोगी सेवेची आचार्यासोबत चर्चा करीत अशा रितीने महारोगी सेवामंडळ हे मंडळ स्वतंत्र परंतु आचार्य आणि आचार्यांच्या इतर कार्याशी एकप्रकारे निगडित झाले.

**8) हरिजन – उपासना :-**

देशात असणारा स्पृश्य अस्पृश्य भेद विनोबाजींना न पटणारा होता. 1932 नंतर यांना खेडयात फिरुन अवलोकन केले आणि वर्धा – नागपुर रोडवरचे 'नालवाडी' हे पुर्ण हरिजन वस्तीचे खेडे होते येथे राहण्याचे विनोबांनी निश्चित केले. आचार्य नालवाडीला रहायला आले. त्यावेळी त्यांच्याभोवती विद्यार्थ्यांचे वातावरण होते. त्यांच्या करवी ग्रामसुधारणेकडे आचार्य लक्ष देऊ लागले. आश्रमवासी पायखाने साफ करीत म्हणून या हरिजनवस्ती मधील लोक त्यांना अस्पृश्य मानीत त्यांना आपल्या विहीरीवर पाणी भरु देत नसत तरी आचार्यातर्फे गावामध्ये कामे सरळ चालु होतीच गावामध्ये साफसफाई करण्याचे, लोकांना उद्योग मिळवून देण्याचे गावात उत्तम शाळा तयार करण्याचे अनेक तऱ्हेचे गावचे कामे हाती घेतली गेली. गावातले लोक नेहमीप्रमाणे साशंक नजरेनेच आश्रमच्या या प्रवृत्तीकडे पहात नालवाडीत विनोबांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी प्रयत्न केले. त्याकरीता भंगीकामा सोबतच चर्मोदयोगही सुरु केला. आचार्याच्या सल्ल्याने क्रमाक्रमाने एक मोठे चर्मालयच नालवाडीत निर्माण झाले या चर्मालयात ब्राम्हाणांना कामाला लावले. कताई सुत विणाईचे प्रयोग केले. जवळ – जवळ वर्षभर रोज सोळा गुंडया सुत कातुन नवा विक्रमच कायम केला.

अस्पृयशता हा हिंदु समाजावरचा कलंक आहे. या गांधीजींच्या सुत्रावर विनोबा शास्त्र वचनावा आधार काढून भाष्य करीत अस्पृश्यता निवारण्याचे, हरिजनसेवेचे काम ते पुज्य भावनेने करीत असत. 'नालवाडी' या हरिजन वस्तीत मुलांना शिकवायचे, आंघोळ घालायची तरुणांना सेवेची दिक्षा दयायची, बायांना भजने सांगायची हा सारा कार्यक्रम चालु असायचा विणकामही येथे हळुहळु वाढु लागले. आचार्य दोन्ही हातांनी सुत कातीत असत. आचार्य नालवाडीला 5 वर्ष राहीले. या काळात सहज पध्दतीने अनेक समाजपयोगी कार्य त्यांनी केले. येथे सरंजाम कार्यालय गोसेवेचे केंद्र, गोपुरीचा वसाहत इत्यादी गोष्टी निर्माण झाल्या.

**9) विनोबांचे सुरगावला भंगीकाम :-**

1946 साली विनोबांनी अंतोदयाकरीता भंगीकाम करायचे असा निश्चय केला. सुरगाव या गावी विनोबांनी भंगीकाम वीस महिने सुर्याच्या नियमिततेने काम केले. तेव्हा ते पवनारला राहायचे तीनमैलाच्या अंतरावर सुरगाव होते. रोज सकाळी फावडे घेऊन ते निघत असत. येण्याजाण्याला दीड – दोन तास लागायचे तेथे तास दीड तास काम करुन ते परतायचे थंडी, उन्हाळा, पावसाळा अशा कोणत्याही ऋतुत त्यांचा हा क्रम भंग पावला नाही. लोकांच्या दृष्टीने हे लहान काम होते परंतु विनोबांच्या दृष्टीने ती उपासना होती. त्यामुळे त्यांनी या उपासनेच्या कामात एक दिवससुध्दा सुट्टी घेतली नाही.

साबरमती आश्रमात असतांना सुध्दा विनोबांचे बंधु बाळकोबा आणि विनोबा या दोघांनी आश्रमात भंगी काम सुरु केले. तेव्हा एकदम खळबळ उडाली होती. पण बापूनी आल्यावर त्यांची प्रशंसा केली. सुरु गावात भंगीकाम करण्याबरोबरच विनोबाजी लहान मुलांना अनेक गोष्टी शिकवित असत याकामात त्यांना लहान मुलेही मदत करीत मुले येऊन त्यांना सांगायची "बाबा आम्ही आज अमुक ठिकाणची जागा साफ केली' गणपती उत्सवाच्या वेळी गावातील सर्व लोकांनी मिळुन संपुर्ण गावाची स्वच्छता केली होती. ते पाहील्यावर विनोबांना वाटले की क्रांती झाली.

**10) डाकुंचे अद्वितीय आत्मसर्मपण :-**

विनोबाजी जेव्हा भूदान यज्ञासाठी फिरत होते तेव्हा दरोडेखोर तहसिलदाराने जेलमधून पत्र पाठवून विनोबांना भेटण्याची विनंती केली. त्यानुसार विनोबा दरोडेखोरांना भेटण्यासाठी गेले. आपल्या वाणीने विनोबांनी दरोडेखोरांचे मत परिवर्तन घडवून आणले आणि दरोडेखोरांनी आत्मसर्मपण केले. ही देशाच्या इतिहासातील एक अदभूतपुर्व घटना मानली जाते. त्यावेळी जो अनुभव आला तसा अनुभव पुर्वी कधी आला नव्हता कठोर हदये विरघळली. नरम झाली आणि सारे वातावरण भगवदीय भावनेने भरुन गेले. ज्या लोकांनी दरोडेखोरांनी हा आपला व्यवसाय बनविला होता ते पश्चतापाच्या भावनेने विनोबांना भेटायला आले आणि त्यांनी आपले सगळे वागणे एकमद बदलून टाकले दुर्बिणी बसविलेल्या भारी किंमतीच्या आपल्या बंदुका विनोबांच्या चरणावर ठेवून दिल्या आणि आत्मसमर्पण केले ते आपल्या मुलाबाळांना भेटले तेव्हाचे दृश्य मन हेलावणारे होते. नंतर त्यांना जेलमध्ये पोहचवण्यात आले. तुम्ही शरण आलात तर तुम्हाला सोडण्यात येईल किंवा तुमची शिक्षा कमी केली जाईल अशी खोटी आश्वासने त्यांना दिली गेली नव्हती उलट तुम्ही जे काही कृत्य केले आहे त्याचे फळतर तुम्हाला मिळेलच हेही स्पष्ट केले होते.

मध्यप्रदेशच्या राज्यपालांनी येऊन विनोबांचे अभिनंदन केले. राष्ट्रपतींनी अभिनंदनाची तार पाठविली देशोदेशींच्या वृत्तपत्रांत अहिंसेच्या चमत्कारावर लेख लिहिले गेले बुध्द देवानी अंगुलीमाल राक्षसाचे परिवर्तन केले त्याची अनेकांना आठवण झाली.

**11) विनोबांचे अलौकिक कार्य – भूदान :-**

आचार्य विनोबांनी भूदान चळवळीचा पुरस्कार केला यामध्ये ही 'सब भूमी गोपाल की, हे मुळ तत्व त्यांनी प्रस्तुत केले ही भूमी जर परमेश्वराची तर त्यावर आपला हक्क कोणत्या नियमाने सांगायचा ? किंबहुना सर्वाचाच अधिकार या जमीनीवर आहे मग कोणी शकडो एकर जागा मालकीची असणारे जमीनदार तर कोणी उपाशी, दारिद्रय भूमिहीन असा भेद का असावा ? याचे उत्तर शोधण्यात गुंतलेले विनोबा समानतेच्या तत्वावर खंबीर राहिले. त्यातुनच त्यांनी भूदानयज्ञाची संकल्पना विशद केली. ज्याच्याकडे भरपूर जमीन आहे त्यांना

भूदान करण्यात प्रवृत्त केले. खरोखरच हे कर्म वैशिष्टयपुर्ण आहे. त्यासाठी त्यांनी 40 हजार, मैल पदयात्रा केली. शांततेचा मार्ग अवलंबुन सर्वोदय साधण्याचे महान, अमोल कार्य केले.

आपल्या पदयात्रेत वाटेतल्या गावांमध्ये थांबुन ते लोकांना भूदान संपप्तिदान आणि ग्रामदान यांची माहिती देत भूदानाला प्रत्येक राज्यात त्यांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला लोक उत्साहाने भूदान दयायचे विनोबांची पदयात्रेतील प्रवचने विविध विचारांनी भरलेली असत. अवघडात अवघड कल्पना, संकल्पना विनोबा खेडुतासमोर बोलताना सोप्यात सोप्या शब्दात आणि तास अर्धा तासाच्या प्रवचनात मांडत असत. त्या प्रवचनातुन भावी काळातील समाजस्थापनेचा आराखडा आणि आशय विनोबा स्पष्ट करुन सांगत असत. अशाप्रकारे विनोबाजींची पदयात्रा म्हणजे एक 'जंगम विद्यापीठच' असे त्यात निरनिळया पातळयांवरचे सुमारे चाळीस ते पन्नास स्त्री पुरुष विद्यार्थी नेहमी सामील असत, या भूदान यज्ञाला रावापासून रंकापर्यंत सर्वांचा हातभार लागला तेरा वर्ष तेरा महीने अशी ही पदयात्रा चालली.

अशाप्रकारे विनोबाजी आयुष्यभर निष्काम राहीलेत समाज कल्याणासाठी त्यांनी केलेल्या समजाकार्यामुळे समाजात चैतन्याचे एकतेचे वातावरण निर्माण झाले.